सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# नाशिक विभाग

( नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव )

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

# २०२४-२५




**डॉ बी बी चव्हाण**
विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग,
नाशिक

**शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक**
email - dydnsk11@gmail.com


शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ठळक बाबी

१.मोबाईलवर वापरण्यायोग्य संकेतस्थळ व मोबाईल ॲप उपलब्ध होणार.

२. विद्यार्थ्यास लॉगिन आयडी व पासवर्ड ऑनलाइन वेळी ऑनलाइन मिळणार तसा संदेश दिलेल्या मोबाईलवर येईल.

३. विद्यार्थ्यांना अर्ज आपल्या घरूनच भरता येणार मोबाईल ॲप मधून अर्ज भरणे माहिती पुस्तिका वाचणे प्रवेश प्रक्रियेची शुल्क भरणे असे विविध कामकाज करता येणार.

४. कागदपत्रे अपलोड करून अर्ज ऑनलाईनच प्रमाणीत होणार.

५. प्रवेश प्रक्रिया शुल्क ऑनलाईनच भरता येणार.

६. शाळा मार्गदर्शन केंद्र विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालय यांना फोनवरून संपर्क साधता येणार.

७. अडचणींच्या निराकरणासाठी कॉल सेंटर अथवा हेल्पलाइन व ऑनलाइन शंका समाधान सुविधा.

८. प्रत्येक कारवाईची सूचना एस एम एस द्वारे मिळेल.

९. प्रत्येक फेरीचे कट ऑफ गुण पाहता येणार हे लक्षात ठेवा.

**शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक**
**email - dydnsk11@gmail.com**

# १.महत्त्वाच्या सज्ञा

१.१ **उच्च माध्यमिक विद्यालय म्हणजे** जेथे इयत्ता ११ वी व इयत्ता 12 वी च्या शिक्षणाची व परीक्षा देण्याची सोय केली जाते यामध्ये माध्यमिक संलग्न उच्च माध्यमिक शाळा स्वतंत्र उच्च माध्यमिक विद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालय यांचा समावेश होतो.

१.२ **अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालय** म्हणजे शासनाने विहित केलेल्या अनुदान सूत्रानुसार शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत असलेली उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय.

१.३ **विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालय** म्हणजे शासनाकडून वेतन व वेतन इतर बाबींसाठी कोणतेही अनुदान मिळत नसलेली उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये कायम शब्द वगळलेल्या कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा समावेश होतो.

१.४ **स्वयंअर्थसाहित उच्च माध्यमिक विद्यालय** याचा अर्थ महाराष्ट्र स्वयंअर्थसाईत शाळा ( स्थापना व विनीयमन ) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात आलेली व होणारा कोणताही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वतःच्या उत्पन्नातून करीत असलेली तसेच

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नसलेली उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय असा आहे. ( इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळांचा यामध्ये समावेश होतो )

१.५ **अल्पसंख्यांक संस्था** म्हणजे महाराष्ट्र शासनाने धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक म्हणून घोषित केलेली संस्था.

१.६ **व्यवस्थापन कोटा** म्हणजे ज्या व्यवस्थापना मार्फत उच्च माध्यमिक विद्यालय चालवण्यात येते त्या व्यवस्थापनेच्या स्तरावरून भरण्यासाठी राखीव ठेवलेली जागा.

१.७ **अल्पसंख्यांक कोटा** म्हणजे ज्या अल्पसंख्यांक (धार्मिक किंवा भाषिक ) संस्थेमार्फत उच्च माध्यमिक विद्यालय चालवण्यात येत आहे त्या व्यवस्थापनाच्या स्तरावरून भरण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागा.

१.८ **इन हाऊस कोटा ( संस्थातर्गत )** म्हणजे ऑनलाइन प्रवेश क्षेत्रातील उच्च माध्यमिक विद्यालयात ज्या संस्थेमार्फत असे उच्च माध्यमिक विद्यालय चालवले जाते त्या संस्थेमार्फत त्याच विभागीय क्षेत्रामध्ये चालविल्या जात असलेल्या माध्यमिक शाळेतून इयत्ता १० वी किंवा सम कक्ष परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या जागा.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

१.९ **ऑनलाइन प्रवेश शेत्र** याचा अर्थ ज्या क्षेत्रामध्ये इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्याचे निश्चित केलेले आहे असे क्षेत्र.

१.१० **तांत्रिक आरक्षण** म्हणजे इयत्ता १० वी च्या स्तरावर व्यावसायिक विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता राखीव ठेवलेल्या जागा.

१.११ **HSVC** म्हणजे कला विज्ञान वाणिज्य शाखे व्यतिरिक्त व्यवसाय शिक्षण संचालनायाचे व्यावसायिक अभ्यासक्रम असलेले चौथी स्वतंत्र शाखा.

१.१२ **द्विलक्षी अभ्यासक्रम / Bifocal Courses** म्हणजे कला विज्ञान व वाणिज्य शाखेमध्ये घेता येणाऱ्या व्यावसायिक शिक्षण संचालनायाचे ( २०० गुणांचे ) वैकल्पिक विषय होय.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# हे लक्षात ठेवा

## उच्च माध्यमिक स्तरावर चार शाखा आहेत

१. कला.    २. विज्ञान.

३. वाणिज्य.    ४. व्यावसायिक अभ्यासक्रम HSVC.

## उच्च माध्यमिक विद्यालये तीन गटात विभागली आहेत

१. सहशिक्षण.

२. मुलांचे.

३. मुलींचे.

## उच्च माध्यमिक विद्यालयाचे अनुदान प्रकारानुसार चार प्रकार आहेत

१. अनुदानित.    २. विनाअनुदानित.

३. अंशतःअनुदानित    ४. स्वयं अर्थ सहाय्य / कायम विनाअनुदानित.

## उच्च माध्यमिक विद्यालयातील अध्यापनाची माध्यमे

१. मराठी    २. इंग्रजी    ३. उर्दू    ४. हिंदी

५. गुजराती    ६. कन्नड    ७. सिंधी

**(सर्व सात माध्यमे प्रत्येक क्षेत्रात उपलब्ध असतीलच असे नाही )**

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक

# इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश मिळण्याचे दोन मार्ग

१. ऑनलाइन प्रवेशाच्या CAP जागा = विविध केंद्रीय प्रवेश फेऱ्यांद्वारे.

२. कोटांतर्गत राखीव जागा = विद्यालय स्तरावरून प्रवेश.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शासन निर्णय

**शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ पासून इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची व्याप्ती राज्यभर वाढविणेबाबत व अधिक सुसूत्रता आणण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रवेश १२२५ / प्र.क्र-१६/ एसडी - २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २५ फेब्रुवारी, २०२५.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः एचएससी १०९७ / (१४४४/९७) / उमाशि - १, दि. २६.०६.१९९७
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः एचएससी १७०९ / (४४/०९) / उमाशि - १, दि. २८.०५.२००९
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः एचएससी- १७०९/ (४४/०९) / उमाशि - १, दि. ०७.०६.२०१०
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः एचएससी- १८११/(४४१/११) / उमाशि - १, दि. १६.०३.२०१२
५) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः संकीर्ण १०१३/प्र.क्र.२३६/१३ / एसडी -२, दि. ०३.०३.२०१४
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः व्यशि २०१४/प्र.क्र. ८२/१४/ एसडी-६, दि. २१.०८.२०१४
७) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्रवेश २०१४/प्र.क्र. १९२ / एसडी -२, दि. १४.०५.२०१५
८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उच्च माध्य २४२/११ ऑनलाईन /६१३१, दि. २७.१०.२०१५
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः न्यायाप्र- २०१५/ (६१/१५)/एसडी-२, दि. २८.०३.२०१६
१०) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्रवेश २०१६/प्र.क्र.(१८०/१६)/एसडी -२, दि. ०७.०१.२०१७
११) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्रवेश ०४२२/प्र.क्र. ४१/एसडी -२, दि. ०९.०१.२०२२

**प्रस्तावना:-**

सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत संदर्भाधिन क्रमांक २ येथील दि. २८.०५.२००९ च्या



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये संदर्भाधिन क्रमांक ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे संदर्भाधिन क्रमांक ५ येथील दि. ०३.०३.२०१४ च्या शासन पत्रान्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीने करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी १२७/२०१४ या जनहित याचिका प्रकरणी दि.०५.०८.२०१५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रक्रीयेबाबत सन २०१६-१७ साठी धोरणनिश्चित करून प्रवेश प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्याच्यादृष्टीने संदर्भ क्रमांक ९ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश राज्यातील मुंबई (MMRDA),पुणे पिंपरी चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्यात येत आहेत.सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची उपयोगीता व व्यवहार्यता लक्षात घेवून तसेच मा . मुख्यमंत्री महोदयांच्या सात कलमी कृती उद्दिष्टांमध्ये असलेल्या EASE OF LIVING या उद्दिष्टान्वये विद्यार्थी व पालकांचे जीवनमान सुखकर बनविणे व याकामी खर्च होणारा वेळ, पैसा व श्रम याचा अपव्यव टाळण्यासाठी **शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ पासून** इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दती राज्यभर राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

मुंबई (MMRDA), पुणे, पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका सोबतच इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दती राज्यभर राबविण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ पासून महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीने करण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी :-

१) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र (MMRDA), पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, अमरावती, नाशिक महानगरपालिका क्षेत्रासोबतच सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना लागू राहील.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर हे उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती उदा. शाखानिहाय तुकड्या, अनुदानित, विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित (स्वयंअर्थसहाय्यित) वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेले विषय इत्यादी तपासून शिक्षण संचालक (माध्यमिक व



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक
email - dydnsk11@gmail.com

उच्च माध्यमिक) यांनी निश्चित केलेल्या ऑनलाईन सेवा पुरवठादारास विहित कालावधीत उपलब्ध करुन देतील.

३) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रकीया राज्यस्तरावर राबविण्यासाठी आयुक्त (शिक्षण) ,पुणे यांनी नियंत्रण ठेवावे व या संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) यांच्या स्तरावर करण्यात यावी.

४) राज्यस्तरावर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टिने विद्यार्थी व पालकांना प्रवेश पध्दती विषयी माहीती उपलब्ध करुन द्यावी. व आवश्यकता असल्यास याविषयी प्रशिक्षणासाठी व्हिडिओ उपलब्ध करून द्यावे.

५) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरावर राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे व अन्य पुर्वतयारी शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) यांच्या स्तरावर करण्यात यावी.

६) नियमित चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर इयत्ता अकरावीचे वर्ग सुरू करण्यात यावेत. तद्नंतर इयत्ता ११ वी चे प्रवेश उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर सर्वांसाठी खुले (OPEN TO ALL) ठेवावेत व सदरचे प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर करण्यात यावेत.याबाबतचे आदेश संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात यावेत.

७) इ.११ वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीनेच होईल.

८) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) यांनी इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्यस्तरावर राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सुचना त्यांच्या स्तरावरुन निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०२२८१८०२५४४९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, [illegible]
Date: 2025.02.28 18:09:17 +05'30'

( तुषार महाजन )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई



**शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक**
**email - dydnsk11@gmail.com**

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
५. प्रधान सचिव, कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
१०. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
११. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१२. सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
१३. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद
१४. शिक्षण निरीक्षक (उत्तर / दक्षिण / पश्चिम), मुंबई
१५. सर्व उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
१६. संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती / एसडी २.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# २.केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया समजून घेऊ

## (अ) ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची व्याप्ती

२.१. **शासन निर्णय क्रमांक: प्रवेश १२२५ प्र.क्र १६ / एसडी-२ दि.२५ / ०२ / २०२५** नुसार राज्य मंडळाशी संलग्न सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक विद्यालयांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया लागू राहील व त्यांना ह्या प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य राहील अर्थात सर्व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेद्वारे केली जाईल.

२.२. राज्य मंडळा व्यतिरिक्त अन्य मंडळाशी संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश या प्रवेश प्रक्रियेद्वारे केले जाणार नाही.

२.३. केंद्रीय ऑनलाइन प्रवेशासाठी कला, विज्ञान,वाणिज्य व व्यावसायिक अभ्यासक्रम या चार शाखा उपलब्ध असतील.

२.४. विहित ऑनलाइन प्रवेश क्षेत्रातील राज्य मंडळ संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही मंडळातून इयत्ता १० वी किंवा सम कक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास इयत्ता ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे लागेल.

२.५. खालील प्रकाराच्या उच्च माध्यमिक विद्यालयांना सदर केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया लागू असणार नाही.



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

अ) रात्र उच्च माध्यमिक विद्यालय.

ब) सैनिकी उच्च माध्यमिक विद्यालय.

क) विशेष शाळा( दिव्यांग / अपंग विद्यार्थ्यांच्या शाळा ).

## (ब) ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती

२.६. इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्य मंडळाचा इयत्ता १० वीचा ऑनलाईन निकाल लागल्यानंतर सुरू होईल तथापि ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग एक निकालापूर्वी पासूनच भरता येईल त्यासाठी जाहीर केलेले वेळापत्रक पाहा.

२.७. राज्य मंडळ इयत्ता १० वी परीक्षेच्या ऑनलाईन निकालानंतर विद्यार्थ्यांना भाग दोन ( पसंती कृत ) भरता येईल व त्यानंतर इयत्ता ११ वी केंद्रीय प्रवेशा करता पुढील प्रमाणे विविध फेऱ्यांचे आयोजन करण्यात येईल.

१. **शून्य फेरी (इन हाऊस व्यवस्थापन व अल्पसंख्यांक कोटा प्रवेशासाठी फक्त)** सदर फेरी नियमित फेऱ्या सुरू होण्यापूर्वी आयोजित करण्यात येईल व प्रवेश प्रक्रिये सुरुवात होईल या फेरीमध्ये केंद्रीय प्रवेश होणार नाही परंतु नियमित फेरी एक साठी प्रवेश अर्ज भाग एक व भाग दोन भरण्याची कार्यवाही या कालावधीमध्ये करता येईल या फेरीपासून सर्व उच्च माध्यमिक विद्यालय व्यवस्थापन संस्थांतर्गत इन हाऊस अल्पसंख्यांक कोटा अंतर्गत विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमानुसार सुरू करतील.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

२. **<u>तीन नियमित फेऱ्या</u>** शून्य फेरीनंतर 3 नियमित फेऱ्यांचे आयोजन केले जाईल नियमित फेऱ्यांमध्ये सर्व शाखांचे प्रवेश गुणवत्तेनुसार आरक्षणा नुसार व विद्यार्थ्यांच्या पसंती क्रमांका नुसार केले जातील.

३. **<u>विशेष फेरी</u>** नियमित तीन फेऱ्या संपल्यानंतर विशेष फेरीचे आयोजन केले जाईल नियमित फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांबरोबरच प्रतिबंधित केलेल्या विद्यार्थ्यांना आणि प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना या फेरीमध्ये सहभागी होता येईल (सर्वांसाठी खुली ).

४. आवश्यकता भासल्यास एटी-केटी तसेच उर्वरित विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त विशेष फेरीचे आयोजन केले जाऊ शकते.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या

**शून्य फेरी**

(कोटा प्रवेश विद्यालय स्तरावरून) पुढील नियमित फेरी एक साठी अर्ज भरणे

↓ केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची सुरुवात

**नियमित फेरी-१**

गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**नियमित फेरी-२**

गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**नियमित फेरी-३**

गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓ **ऑनलाइन संमती देणे बंधनकारक**

**विशेष फेरी**

गुणवत्ता पसंतीक्रम

( प्रतिबंधित प्रवेश रद्द केलेले व अद्याप प्रवेश न मिळालेले विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात )

↓

**?**

आवश्यकता भासल्यास अतिरिक्त विशेष फेऱ्यांचे आयोजन केले जाऊ शकते ( एटीकेटी व उर्वरित विद्यार्थ्यांसाठी )

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक
email - dydnsk11@gmail.com

# ऑनलाइन अर्ज आवश्यक

ऑनलाइन प्रवेश क्षेत्रामधील उच्च माध्यमिक विद्यालयात कोणत्याही शाखेसाठी प्रवेश मिळवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी दिलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे राखीव कोट्या अंतर्गत प्रवेश घ्यावयाचा असेल तरीही ऑनलाइन प्रणाली द्वारे अर्ज करणे अनिवार्य आहे.

## (क)राखीव कोट्यांतर्गत प्रवेश

२.८. उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेशाच्या CAP जागांव्यतिरिक्त संस्थांतर्गत इन हाऊस कोटा व्यवस्थापन कोटा व अल्पसंख्यांक शाळांसाठी अल्पसंख्यांक कोटा राखीव असेल कोठाअंतर्गत जागांवरील प्रवेश महाविद्यालय स्तरावरून गुणवत्तेनुसारच केले जाते.

२.९. कोट्यांतर्गत प्रवेशासाठी सुद्धा विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

२.१०. **इन हाऊस कोटा (संस्थांतर्गत कोटा)**

**१.** या कोट्यांतर्गत सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये १०% जागा राखीव असतील तथापि याच संस्थेची इयत्ता १० वी वर्ग असलेली माध्यमिक शाळा नसेल अशा उच्च माध्यमिक विद्यालयात इन हाऊस कोटा लागू होणार नाही.

**२.** उच्च माध्यमिक विद्यालय चालविणाऱ्या संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील ( त्याच विभागातील ) इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थी या कोट्यांतर्गत  प्रवेशासाठी पात्र असते.

**३.** अल्पसंख्यांक व बिगर अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालयांना इनहाऊस कोट्या मधील जागा नियमित फेरी एक पूर्वी अथवा विशेष फेरी संपल्यानंतर भरता येतील उर्वरित जागा पहिल्या फेरीपूर्वी किंवा नियमित फेरीतील संपल्यानंतर विशेष फेरीपूर्वी प्रत्यर्पित  करता येतील.

## २.११.**व्यवस्थापन कोटा**

**१.** या कोट्यांतर्गत सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये 5% जागा राखीव असते यामधील प्रवेश व्यवस्थापकीय संस्था त्यांचे अधिकारात करू शकतील.

**२.** अल्पसंख्यांक व बिगर अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालयांना व्यवस्थापन कोट्या मधील जागा प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर भरता येतील तसेच प्रत्यार्पित करता येतील.

## २.१२.**अल्पसंख्यांक कोटा**

**१.** अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये केवळ अल्पसंख्यांक ( धार्मिक किंवा भाषिक ) समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी या कोट्यांतर्गत 50% जागा राखीव असतील.



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

२. या कोट्यातून प्रवेशासाठी केवळ अल्पसंख्यांक ख्रिश्चन जैन बौद्ध मुस्लिम शेख पारशी इत्यादी धार्मिक अल्पसंख्यांक व भाषिक अल्पसंख्यांक विद्यार्थी पात्र असतील.

३. अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालयांना अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत उपलब्ध असणाऱ्या जागा नियमित तीन फेऱ्या संपेपर्यंत भरता येतील अल्पसंख्यांक कोट्यातील जागा रिक्त राहिल्यास तीन नियमित फेऱ्या संपल्यानंतरच प्रत्यार्पित करता येतील.

*** तीनही कोट्यांतर्गत देण्यात आलेले प्रवेश यथा शीघ्र प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर नोंदविणे उच्च माध्यमिक विद्यालयास बंधनकारक आहे***

## (ड)प्रवेशासाठी राखीव जागा ( आरक्षण )

सर्व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश हे प्रचलित नियमानुसार वैधानिक (घटनात्मक) व विशेष आरक्षणाची टक्केवारी विचारात घेऊन दिले जातील.

### १. संविधानिक / सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागा ( बिगर अल्पसंख्यांक शाळा )

| क्र | प्रवर्ग | आरक्षित जागा |
|---|---|---|
| १ | **अनुसूचित जाती (SC)** | १३% |
| २ | **अनुसूचित जमाती (ST)** | ०७% |



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

| | | |
|---|---|---|
| ३ | विमुक्त जाती -अ (VJ-A) | ०३% |
| ४ | भटक्या जमाती ब (NT-B ) | २.५% |
| ५ | भटक्या जमाती क (NT-C) | ३.५% |
| ६ | भटक्या जमाती ड (NT-D) | ०२% |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | ०२% |
| ८ | इतर मागासवर्गीय (OBC) | १९% |
| ९ | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | १०% |
| खुल्या प्रवेशासाठी | | ३८% |

## २.कोटा निहाय राखीव जागा

| क्र | कोटा | अल्पसंख्यांक संस्थांच्या उच्च माध्यमिक विद्यालय | बिगर अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | इन हाऊस कोटा | १०% | १०% |
| २ | व्यवस्थापन कोटा | ५% | ५% |
| ३ | अल्पसंख्यांक कोटा | ५०% | लागू नाही |

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ३.समांतर आरक्षण / विशेष आरक्षण प्रवर्ग

| क्र | विशेष आरक्षण | अल्पसंख्यांक संस्थांच्या उच्च माध्यमिक विद्यालय | बिगर अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | महिला | ३०% | ३०% |
| २ | दिव्यांग अपंग | ४% | ४% |
| ३ | प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त | ५% | ५% |
| ४ | अ. बदलीने आलेल्या राज्य शासन केंद्र शासन खाजगी क्षेत्रातील कर्मचारी यांचे पाल्य<br>ब. आजी माझी सैनिकांच्या पत्नी पाल्य स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य<br>क. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विजेते सहभागी खेळाडू विद्यार्थी व राष्ट्रीय | ५% | ५% |

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| | स्तरावरील स्पर्धांमध्ये पदक विजेते खेळाडू | | |
| ५ | अनाथ मुले (खुल्या प्रवर्गातून ) | १% | १% |
| उर्वरित जागा (शुद्ध प्रवर्ग ) | | ५५% | ५५% |

## इ )शालेय शुल्क

२.१३. उच्च माध्यमिक विद्यालयातील अनुदानित तुकडील साठी शासन नियमाप्रमाणे शुल्क आकारले जाते.

२.१४. विनाअनुदानित स्वयंअर्थसाईट कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांची शुल्क संबंधित व्यवस्थापना मार्फत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनी यमन अधिनियम 20११ नुसार निश्चित केले जाते त्यामुळे वेगवेगळ्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे शुल्क वेगवेगळे असू शकते.

२.१५. अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयातील विनाअनुदानित तुकडींसाठी उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून शुल्क आकारले जाते त्यामुळे एकाच विद्यालयात अनुदानित विनाअनाने तुकड्यांसाठी वेगवेगळे शुल्क असू शकते.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

२.१६. द्विलक्षी व माहिती तंत्रज्ञान या अतिरिक्त विषयांचे शुल्क वेगळे असेल.

२.१७. शुल्काबाबत अधिक तपशील संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात संपर्क साधून मिळवता येईल तसेच शुल्क बाबतीत ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२.१८. ऑनलाइन प्रवेश क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना सदर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक आहे ऑफलाइन पद्धतीने झालेले प्रवेश इयत्ता 12 वी परीक्षेसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत त्यामुळे या ऑनलाइन प्रक्रिये शिवाय अन्य मार्गाने प्रवेश घेऊ नये.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ३.विद्यार्थी नोंदणी व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे

## अ) सर्वसाधारण बाबी

३.१.प्रत्येक विद्यार्थ्यास एकच अर्ज भरता येईल त्यासाठी प्रथम ऑनलाइन विद्यार्थी नोंदणी करावी.

३.२.केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज संकेतस्थळावर दोन टप्प्यांमध्ये भरावयाचा आहे भाग एक वैयक्तिक माहिती व भाग दोन पसंतीक्रम

३.३.अर्जाचा भाग एक भरण्याची सुविधा विद्यार्थी नोंदणी नंतर उपलब्ध होईल या भागातील माहिती एकदाच भरून प्रमाणित करून घ्यावयाची आहे ही प्रक्रिया १० वी परीक्षेच्या निकालापूर्वी सुरू होऊ शकते.

३.४.अर्जाचा भाग दोन भरण्याची सुविधा भाग एक प्रामाणिक करून घेतल्यानंतर उपलब्ध होईल तसेच प्रत्येक फेरीपूर्वी भाग दोन मधील माहिती किंवा पसंती क्रम अद्यावत करता येईल.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

## ब)ऑनलाइन नोंदणी कशी करावी

३.५.प्रवेश प्रक्रियेची माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध आहे त्याचे वाचन करा.

३.६.नमुना अर्ज भरण्यापूर्वी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा व संपूर्ण प्रवेश प्रक्रिया समजून घ्या . यासाठी आपल्या शाळेची अथवा मार्गदर्शन केंद्राची मदत घ्या.

३.७.प्रवेशासाठी शेत्र निश्चित करा व योग्य संख्येत स्थळ किंवा वेबसाईट उघडा. ( स्टुडन्ट रजिस्ट्रेशन )

३.८.संकेतस्थळावर नोंदणी करताना तुमचा इयत्ता १० वीचा बैठक क्रमांक व मोबाईल नंबर टाकल्यानंतर लॉगिन आयडी तुम्हास प्राप्त होईल पासवर्ड तुम्हा स्वतः तयार करावयाचा आहे मिळालेले लॉगिन आयडी व पासवर्ड लॉगिन करण्यासाठी वापरा आपला पासवर्ड व लॉगिन आयडी जपून ठेवा तसेच इतर कोणासही सांगू नका.

३.९.तुमचा लॉगिन आयडी व पासवर्ड एसएमएस द्वारे तुमच्या मोबाईलवर सुद्धा पाठवला जाईल जर एसएमएस आला नाही तर नोंदणीनंतर स्क्रीनवर दाखविलेल्या लॉगिन आयडी नोंदवून ठेवा.

३.१०.नोंदणी करताना निवडलेल्या सिक्युरिटी प्रश्नाचे उत्तर लक्षात ठेवा सिक्युरिटी प्रश्न व पासवर्ड याची प्रिंट घ्या व जपून ठेवा.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक

## क)प्रवेश अर्ज कसा भरावा भाग-१

३.११.तुम्हाला मिळालेल्या लॉगिन आयडी व पासवर्ड च्या साह्याने लॉगिन करा व संगणकावर दिलेल्या सूचनांप्रमाणे टप्प्याटप्प्याने ऑनलाइन अर्ज भरा.

३.१२.महाराष्ट्र राज्य मंडळाच्या मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी परीक्षेत नियमित बसलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचा बैठक क्रमांक टाकल्यावर त्यांची वैयक्तिक माहिती आपोआप येईल ती तपासून घ्या आपोआप येणाऱ्या वैयक्तिक माहितीमध्ये काही दुरुस्ती असावी असल्यास शाळा किंवा मार्गदर्शन केंद्रातून दुरुस्ती करून घ्यावी. (Grievance Redressal सुविधेचा उपयोग करा )

३.१३.ज्या विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर बैठक क्रमांक टाकल्यावर येणार नाही त्यांनी तसेच अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांनी सर्व माहिती स्वतः भरावयाची आहे.

३.१४.तुम्हाला तुमचा अर्ज करूनच भरता येईल तसेच अर्ज भरण्याची सुविधा मोबाईल ॲप मध्येही उपलब्ध आहे संपूर्ण अर्ज भाग एक भरून झाल्यानंतर अर्जातील माहिती म्हणजेच स्वतःचे नाव आईचे नाव जन्मतारीख जात प्रवर्ग आरक्षण इत्यादी अचूक असल्याची खात्री करा व शुल्क भरून अर्ज लाख करा.

३.१५.आवश्यक कागदपत्रे अपलोड करा ती स्पष्ट व वाचनीय असावी तसेच त्यांचा आकार( साईज ) 1 एमबी पेक्षा जास्त नसावा अपलोड

शिक्षण उपसंचालक नाशिक

करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील संकेत स्थळ आपोआप दर्शवेल.

३.१६.अर्ज लॉक करण्यापूर्वी तो प्रमाणित करण्यासाठी नजीकचे मार्गदर्शन केंद्र निवडा जर तुमची इयत्ता १० वीची शाळा ऑनलाइन क्षेत्रामध्ये असेल तर तुमचा अर्ज प्रमाणित करण्यासाठी आपोआप तुमच्या शाळेकडे जाईल त्या ठिकाणाहून अर्ज प्रमाणित म्हणजे व्हेरिफाय करून घ्यावा.

३.१७.जर अर्ज ऑटो व्हेरिफाइड झाल्यास तो पुन्हा वेगळ्याने प्रमाणित करून घेण्याची आवश्यकता नाही.

३.१८.आपण अपलोड केलेली प्रमाणपत्रे तपासून आपला अर्ज ऑनलाइन प्रमाणित केला जाईल आपला अर्ज प्रमाणित झाला नसल्यास दिलेल्या नंबर वर फोन करून त्याबाबत मार्गदर्शन केंद्रास किंवा शाळेत विचारणा करावी 48 तासानंतर आपण निवडलेले व्हेरिफिकेशन केंद्र बदलता येईल.

३.१९.अर्ज भाग एक भरून झाल्यावर डॅशबोर्ड तपासा तेथे व्हेरिफाईड असणे आवश्यक आहे जे विद्यार्थी फॉर्म प्रमाणे म्हणजे व्हेरिफाय करून घेणार नाही त्यांचा अर्ज अपूर्ण राहील व असे अर्ज प्रवेश प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाही तसेच त्यांना भाग 2 पसंतीक्रम भरता येणार नाही.



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

३.२०.आपल्या अर्जाची प्रिंट काढून स्वतःकडे ठेवावी प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर ज्यांना भाग एक मधील माहिती मध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल त्यांना आपल्या शाळे कडून अथवा मार्गदर्शन केंद्राकडून दुरुस्ती करून घेता येईल किंवा अर्ज स्वतः आणला करून त्यात बदल करता येईल.

## ड)प्रवेश अर्ज भाग-२ पसंती क्रम निवडणे.

३.२१.भाग-१ मधील माहिती प्रमाणित म्हणजे व्हेरिफाय केल्यानंतरच प्रवेश अर्जाचा भाग दोन पसंती क्रम विद्यार्थ्यांना भरता येईल.

३.२२.भाग-२ सुरू झाल्यावर राज्य मंडळाच्या मार्च 2024 च्या नियमित विद्यार्थ्यांचे इयत्ता १० वीचे सर्वोत्तम 5 म्हणजे बेस्ट ऑफ फाईव्ह विषयांचे मिळालेले गुण व शेकडा गुण आपोआप दिसतील.

३.२३.ज्या विद्यार्थ्यांचे गुण आपोआप येणार नाहीत त्यांनी तसेच इतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे इयत्ता १० वीचे गुण स्वतः म्हणजे मॅन्युअली अचूक नोंदवावेत.

३.२४.प्रवेशासाठी एका शाखेची व एका माध्यमाची निवड करावी त्यानंतर ती शाखा किंवा माध्यम असणाऱ्या सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांची यादी अनुदानित विनाअनुदानित स्वयं अर्थसहायित विद्यार्थ्यास दर्शवली जाईल त्यानुसार पसंती क्रम ठरवावा.

३.२५.प्रवेशासाठी आपल्या पसंतीचे किमान एक व कमाल १० उच्च माध्यमिक विद्यालय निवडा व त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करा त्यानंतर अर्जाची प्रिंट घ्या व जपून ठेवा.

३.२६.प्रत्येक फेरीत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता म्हणजे इयत्ता १० वीचे गुण आरक्षण व विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक विद्यालयाचा दिलेला पसंती क्रम विचारात घेतला जाईल.

३.२७.वेळापत्रक व प्रवेशाची कार्यपद्धती वेळोवेळी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल त्यासाठी संकेतस्थळास सतत भेट देत राहा.

## विशेष फेरीसाठी संमती नोंदविणे

***प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यास पसंती क्रम देण्याची अथवा त्यामध्ये बदल करण्याची संधी दिली जाईल.**

***जर विद्यार्थ्यांनी एखाद्या फेरीपूर्वी आपले पसंती क्रम बदलले नाहीत तर त्याचे मागील फेरीचे पसंती क्रम पुढे ग्राह्य धरण्यात येतील ही सुविधा फक्त तीन नियमित फेऱ्यांसाठी लागू असेल.**

***प्रत्येक विशेष फेरीपूर्वी विद्यार्थ्याने ऑनलाइन संमती नोंदविणे अनिवार्य असेल जे विद्यार्थी संमती नोंदविणार नाही त्यांचा त्या विशेष फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ४.विद्यार्थ्यांनी घ्यावयाच्या दक्षता

## ४.१.विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना (ऑनलाइन नोंदणी व अर्ज करणे )

१. विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तकेत दिलेल्या माहितीचा व्यवस्थित अभ्यास करून आपणास हवे असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे शाखेचे नाव तसेच सांकेतांक म्हणजे कोड नंबर्स प्रवेश अर्जात अचूक भरा ऑनलाइन प्रवेश अर्ज भाग एक व भाग दोन संपूर्ण भरून झाल्यावर सबमिट लॉक करण्यापूर्वी अर्जाची पुन्हा एकदा पडताळणी करा.

२. एकापेक्षा अधिक प्रयत्न इयत्ता १० वी किंवा सम कक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या म्हणजे रिपीटर विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरताना त्यांच्या वेळोवेळी उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या गुणांची बेरीज करून एकूण गुण अचूक नोंदवावेत उत्तीर्ण असलेल्या विषयांचे गुण नोंदवू नयेत.

३. प्रवेश अर्ज भाग दोन मध्ये योग्य पसंती क्रम भरा किंवा तेच ते पसंती क्रम देण्याचे टाळा त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करा यामुळे तुम्हाला लवकर प्रवेश मिळण्यास मदत होईल.

४. एकाच उच्च माध्यमिक विद्यालयातील शाखा अनुदान प्रकार माध्यम विचारात घेऊन त्याला स्वतंत्र सांकेतांक कोड दिलेले आहेत त्यामुळे एकाच विद्यालयाला शाखा अनुदान प्रकार माध्यम यानुसार एकापेक्षा

अधिक सांकेतांक असू शकतात त्यामुळे विद्यालय तसेच शाखा कोड निवडताना दक्षता घ्या.

५. पसंती क्रम निश्चित करताना त्या उच्च माध्यमिक विद्यालयाची मागील कट ऑफ आपणास मिळालेले गुण हवी असलेली शाखा फी माध्यम अनुदान प्रकार शिकवले जाणारे वैकल्पिक विषय  निवासापासूनचे अंतर जाण्या येण्याची सोय वस्तीगृह सुविधा क्रीडांगण इत्यादी बाबींचा साकल्याने विचार करून पसंतीक्रम ठरवा.

६. विद्यार्थ्यास प्रवेशासाठी त्यांच्या पसंतीनुसार किमान एक व कमाल १० उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रसंती क्रम देता येतील परंतु प्रथम पसंती क्रम मिळाल्यास प्रवेश घेणे सक्तीचे असे.

७. प्रत्येक फेरीला पसंती क्रम बदलण्याची मुभा असल्यामुळे प्रत्येक फेरी स्वतंत्र असणार आहे पसंती क्रम ठरवितांना मागील फेरीचे कट ऑफ तपासा.

## ४.२.उच्च माध्यमिक विद्यालय / तुकडी कोडची रचना

विद्यालय कोड आठ अक्षरी असून त्यात अक्षरे व अंक समाविष्ठ आहेत.


उदा. नाशिक १.विज्ञान अनुदानित इंग्रजी माध्यम –NK123SGE

२.कला विनाअनुदानित उर्दू माध्यम –NK123ANU

३.वाणिज्य स्वयंअर्थसहायित मराठी माध्यम-NK123CFM



शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग




**१.क्षेत्रनिहाय कोड –** नाशिक (NK)

**२.शाखानिहाय कोड –** कला (A),विज्ञान(S),वाणिज्य(C),व्यावसायिक अभ्यासक्रम HSVC(H)

**३.अनुदान प्रकारानुसार कोड-** अनुदानित(G),विनानुदानित (N), स्वयंअर्थसहायित(F)

**४.माध्यमनिहाय कोड –** मराठी(M),इंग्रजी(E),उर्दू(U),हिंदी(H), गुजराथी(G),कन्नड(K), सिंधी (S)

## ४.३.नियमित फेऱ्यांसाठीचे नियम

८. प्रत्येक फेरीपूर्वी उच्च माध्यमिक विद्यालयातील रिक्त जागा घोषित करण्यात येतील त्यांचे संकेतस्थळावर अवलोकन करूनच पुढील योग्य निर्णय घ्यावा.

९. विशेष फेरीपूर्वी संमती नोंदविणे आवश्यक आहे विशेष फेरीसाठी मागील पसंती क्रम पुढे जसेच्या तसे आपोआप घेतले जाणार नाहीत.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

*प्रवेशित विद्यार्थ्यास प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रवेश रद्द करता येईल तथापि अशा विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये पुन्हा सहभागी व्हायचे असल्यास ऑनलाईन संमती नोंदवून विशेष फेरीमध्ये सहभागी होता येईल घेतलेला प्रवेश रद्द केल्यास नियमित फेऱ्यांमध्ये आपणास संधी मिळत नाही विशेष फेरीपर्यंत थांबावे लागेल.

*तसेच प्रथम पसंती क्रम मिळूनही प्रवेश न घेतलेल्या अथवा विद्यालयाकडून प्रवेश नाकारण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनाही पुढील नियमित फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही नियमित फेऱ्यांसाठी.

**प्रतिबंधित होण्याची तीन कारणे**

१. पहिला पसंती क्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही तर

२. विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द केल्यास

३. संबंधित विद्यालयाने विद्यार्थ्यास प्रवेश नाकारल्यास म्हणजे अर्जातील चुकीच्या माहितीमुळे

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# प्रवेश अर्ज मागे घेणे

ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर आयटीआय तंत्रनिकेतन म्हणजे पॉलिटेक्निक सारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या अथवा या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये द्वारे प्रवेश घेणार नसलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज मागे घेण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल तरी ज्यांना इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेमध्ये पुन्हा यायचे नाही त्यांनी विड्रॉल ऑफ एप्लीकेशन हा पर्याय वापरून प्रक्रियेमधून बाहेर पडावे यामुळे इतरांना संधी मिळेल.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# ५.प्रवेश फेरीची यादी जाहीर झाल्यावर

प्रवेश फेरी यादी जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाची माहिती विद्यार्थी लॉगिन मध्ये दर्शविण्यात येईल ती तपासून पहावी व पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

## अ ) प्रथम प्राधान्यक्रम मिळाल्यास

१. विद्यार्थ्यास पहिला पसंती क्रम दिलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश मिळाला असल्यास त्या उच्च माध्यमिक विद्यालयात आपली मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती वेळापत्रकाप्रमाणे विहित मुदतीत दिलेल्या सूचनेनुसार सादर करून फी भरून प्रवेश घेणे अनिवार्य राहील.

२. पहिल्या पसंती क्रमांकाचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळूनही घेतला नाही तर अशा विद्यार्थ्यांची नावे संबंधित शाखेसाठी पुढील नियमित फेरीसाठी प्रतिबंधित म्हणजे रिस्ट्रीक्ट करण्यात येतील मात्र अशा विद्यार्थ्यांना ऑनलाइन संमती नोंदवून विशेष फेऱ्यांमध्ये सहभागी होता येईल.

## ब )अन्य दोन ते दहा पैकी एक प्राधान्यक्रम मिळाल्यास

३. पहिल्या पसंती क्रमां व्यतिरिक्त अन्य पसंती अंकाचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळाल्यास व ते विद्यार्थ्यास मान्य असल्यास असे विद्यार्थी

निर्धारित कालावधीत सदर उच्च माध्यमिक विद्यालयात आपली मूळ कागदपत्रे व छायांकित प्रती सादर करून व फी भरून आपले प्रवेश निश्चित करू शकते

४. अशा विद्यार्थ्यांनी निर्धारित कालावधीत संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना पुढील फेरीसाठी पसंती क्रम बदलण्याची मुभा देण्यात येईल पसंती क्रम न बदलल्यास पसंती क्रम गृहीत धरून कार्यवाही केली जाईल

५. अर्जदाराने प्रवेश घेतल्यानंतर त्याला संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाकडून संगणकीकृत प्रवेश पावती देण्यात येईल

६. प्रवेश घेण्यास जाण्यापूर्वी विद्यार्थी लॉगिन मध्ये प्रोसेड फॉर ऍडमिशन बटन दाबा प्रवेश घ्यायचा असेल तरच व प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाशी संपर्क साधा प्रवेश घ्यावयाचा नसल्यास ही कृती करण्याची आवश्यकता नाही.

७. प्रवेश फेरीमध्ये प्रवेशासाठी कोणतेही उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले नसल्यास अशा विद्यार्थ्यांचा समावेश पुढील फेरीमध्ये करण्यात येईल.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# आवश्यक कागदपत्रे

१. इयत्ता १० वी किंवा समक्ष परीक्षेचे मूळ गुणपत्रक

२. इयत्ता १० वी शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत

३. आधार कार्ड छायांकित प्रत

४. दोन पासपोर्ट साईज फोटो

५. सामाजिक प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी

६.जात प्रमाणपत्र

७. संविधानिक आरक्षणाचा लाभ महाराष्ट्र बाहेरील इतर राज्याचे मागासवर्गीय प्रमाणपत्र धारक विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

८. विजाभज इमाव विमाप्र साशैमाप्र या प्रवर्गासाठी उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसले बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

९. आर्थिक दुर्बल घटकांसाठी पात्रता प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

# विशेष आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी

१. दिव्यांग जिल्हा शल्य चिकित्सक यांचे 40% पेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२. प्रकल्पग्रस्त किंवा भूकंपग्रस्त संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेला विहित नमुन्यातील दाखल्याच्या आधारे प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा कुटुंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला प्रवेश सवलतीच्या संदर्भात द्यावयाच्या दाखल्याचे प्रमाणपत्र.

३. बदलीने आलेल्या राज्य शासन केंद्र सरकार खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे पाल्य या आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकाची बदली मागील वर्षी एक ऑक्टोंबर नंतर झालेली असावी याबाबत कर्मचाऱ्यांचे बदली आदेश व बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्याचा अहवाल प्रवेशाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

४. आजी सैनिक- सेवेत असल्याचा दाखला व माजी सैनिक जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा सेवा मुक्ती दाखला.

५. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांवर अवलंबून असलेल्या व स्वातंत्र्यसैनिकांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींचे पाल्य स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून इयत्ता ११ वी प्रवेशासाठी आरक्षणाचा लाभ घेताना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग

**शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग,नाशिक**

**email - dydnsk11@gmail.com**

६. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू विद्यार्थी खेळाडू विद्यार्थ्यांना राखीव जागांवर प्रवेश देत असताना त्यांचा प्राधान्यक्रम.

१. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील पदक  विजेते खेळाडू.

२. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडू.

३. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये पदक विजेते खेळाडू.

७. अनाथ मुले या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना विभागीय आयुक्त महिला व बाल विकास विभाग यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८. तांत्रिक आरक्षण व्यवसायिक सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी इयत्ता १० वी मध्ये व्यावसायिक विषय अभ्यासले असणे आवश्यक आहे तशी नोंद गुणपत्रकात असावी.

९. परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित देशातील दूतावासाची सही व शिक्का असलेले दाखला व गुणपत्रक सादर करावे दाखला व गुणपत्रक इंग्रजी भाषेतील असावे परदेशी अथवा महाराष्ट्राचे रहिवासी नसणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.